**Sanskriti, August 25, 2011**

# टीसीएस आयटी विझ २०११ पुणे फेरीचे विजेतेपद आर्मी पब्लिक स्कूलने पटकावले




**पुणे** : टाटा कन्सलटन्सी सर्व्हीसिसने (टीसीएस) आयोजित केलेल्या टीसीएस आयटी विझच्या विभागीय फेरीला पुण्यातील ४५ शाळांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. पुण्यातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे मंगळवारी भारतातील सर्वांत मोठी आंतरशालेय आयटी क्वीझ म्हणून नावाजल्या जाणाऱ्या टीसीएस आयटी विझची पुणे फेरी आयोजित करण्यात आली होती. ८५० हूनही अधिक विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. प्राथमिक फेरीतील क्वीझिंगच्या अवघड फेऱ्या यशस्वीपणे पार करुन आर्मी पब्लिक स्कूलच्या ग्यानेंद्र मिश्रा व एस. ऋष्यिराज यांनी विनर्स ट्रॉफीवर आपले नाव कोरले. ट्रॉफीच्या व्यतिरिक्त या दोघांनाही प्रत्येकी एक-एक गॅलेक्सी टॅब्लेट व डिजिटल कॅमेरा बक्षिस म्हणून देण्यात आले. त्यांच्या पाठोपाठ त्यांना कडूर लढत देत मॉर्डन ज्युनिअर कॉलेज स्कूलच्या तनय चांदकर व निषाद डावखर यांनी उपविजेतेपद पटकावले. या दोघांना बक्षिस म्हणून ट्रॉफी व आयपॉड टच देण्यात आले.

सुझलॉन एनर्जी लिमिटेड, पुण्याच्या इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष श्री. शिरिष गोडबोले, पुण्याच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे संचालक प्रोफेसर ए. सहस्त्रबुद्धे यांच्याबरोबरीनेच टीसीएसचे सेन्टर हेड श्री. अरविंद पाध्ये व टीसीएसचे उपाध्यक्ष प्रोफेसर हॅरीक विन यांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. यावेळी अंतिम फेरीपर्यंत पोहोचलेल्या सहा संघांना टीसीएसकडून ट्रॅव्हल बॅग्ज्, हेडफोन्स, पोर्टेबल स्पीकर्स, लेझर पॉईंटर्स, युएसबी पेन ड्राईव्हज् व इतरही अनेक बक्षिसे देण्यात आली. इतकेच नव्हे तर, टीसीएस आयटी विझसाठी उपस्थित असलेल्या, बरोबर उत्तरे देणाऱ्या प्रेक्षकांनाही थॅंकपॅक्स, पेन ड्राईव्हस, मिनी पोर्टेबल स्पीकर्स व टी-शर्टस् अशी बक्षिसे देण्यात आली.